# पिरामल एंटरप्रायझेस लिमिटेड

**सीआयएन:** २४११०एमएच१९४७पीएलसी००५७१९
**नोंदणी कार्यालय:** पिरामल टॉवर, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई- ४०००१३.
**फोन क्र.:** (०२२) ३०४६७८३९; **फॅक्स क्र.:** (०२२) ३०४६७८५५
ईमेल आयडी : complianceofficer.pel@piraml.com वेबसाईट : www.piraml.com

## सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, पिरामल एंटरप्रायझेस लिमिटेड ('कंपनी') च्या सभासदांची **६९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम)** ही दिनांक १६ मे, २०१६ रोजीच्या एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी **वालचंद हिराचंद हॉल, इंडियन मर्चंट्स् चेंबर्स बिल्डिंग, ४ था मजला, आयएमसी मार्ग, चर्चगेट, मुंबई- ४०००२० येथे सोमवार, १ ऑगस्ट, २०१६ रोजी दु. ३.०० वा.** घेण्यात येणार आहे. ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता वार्षिक अहवालाचा उर्वरित भाग जो त्यांचे नोंदणीकृत पत्ते/ईमेल आयडीवर कंपनी अधिनियम, २०१३ च्या तरतुदी आणि त्याअंतर्गत स्थापित नियमाच्या तरतुदींव्ये परवानगी असलेल्या पध्दतीने सभासदांना पाठविण्यात आला आणि पाठविण्याचे काम ८ जुलै, २०१६ रोजी पूर्ण झाले आहे.

ज्या सभासदांना ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता वार्षिक अहवालाची प्रत प्राप्त झालेली नाही किंवा प्रत्यक्ष प्रत प्राप्त करण्यासाठी इच्छुक आहेत ते लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, युनिट : पिरामल एंटरप्रायझेस लिमिटेड, सी-१३, पन्नालाल सिल्क मिल्स कंपाऊंड, एल.बी.एस. मार्ग, भांडुप (प.), मुंबई- ४०००७८ येथे लेखी विनंती पाठवू शकतात किंवा piramal.irc@linkintime.co.in येथे ईमेल पाठवू शकतात.

एजीएमला हजर राहून मतदान करण्यासाठी हक्कदार असलेले सभासद हे ठरावावर त्यांच्या ऐवजी हजर राहुन मतदान करण्यासाठी प्रतिपत्री व्यक्ती किंवा व्यक्तींची नियुक्ती करण्यास हक्कदार आहेत आणि प्रतिपत्री व्यक्ती कंपनीची सभासद असणे आवश्यक नाही.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ सहवाचता कंपनीज (मॅनेजमेंट अँण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ च्या नियम २० सहवाचता सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ अनुसार:

१. कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमाने ६९ व्या एजीएममध्ये त्यांचा मतदानाचा हक्क वापरण्याची सुविधा सभासदांना पुरविली आहे आणि सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लि. (सीडीएसएल) द्वारे पुरविलेल्या ई-मतदान सेवेमार्फत व्यवसायाचा व्यवहार करता येईल. ई-मतदानाची माहीती एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे.

२. दूरस्थ ई-मतदानाला २९ जुलै, २०१६ रोजी स. १०.०० वा. सुरुवात होईल आणि ३१ जुलै, २०१६ रोजी सायं. ५.०० वा. संपेल. कंपनीचे सर्व सभासद ज्यांची नावे कटऑफ तारीख अशा २५ जुलै, २०१६ रोजीस नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) आणि सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) कडून प्राप्त झालेल्या लाभकारी मालकांची सूची/सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील ते दूरस्थ ई-मतदान सुविधा घेण्यास तसेच बॅलट पेपरमार्फत एजीएममध्ये मतदान करण्यास हक्कदार राहतील. भागधारकांचे मतदानाचे हक्क हे सदर कटऑफ तारखेस कंपनीच्या पूर्णदेय समभाग भांडवलामधील त्यांच्या भागांच्या प्रमाणात राहतील. ई-मतदान मॉड्युल ३१ जुलै, २०१६ रोजी सायं. ५.०० वा. नंतर मतदानाकरिता सीडीएसएलद्वारे बंद करण्यात येईल.

३. ज्या व्यक्ती २५ जुलै, २०१६ (कटऑफ तारीख) रोजी वा पूर्वी परंतु एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीच्या सभासद बनलेल्या आहेत ते दूरस्थ ई-मतदानाकरिता युजर आयडी आणि पासवर्डकरिता विनंती evoting.investor@linkintime.co.in कडे पाठवू शकतात. ज्या सभासदांनी दूरस्थ ई-मतदानाकरिता सीडीएसएलकडे अगोदर नोंदणी केलेली आहे ते सदर हेतूकरिता त्यांचा विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरु शकतात.

४. श्री. एन. एल. भाटिया, कार्यरत कंपनी सचिव यांची मोकळ्या आणि पारदर्शक बाबींमध्ये ई-मतदान आणि बॅलट पेपरमार्फत मतदान घेण्यासाठी परिनिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

५. सभासदांना त्यांनी दूरस्थ ई-मतदान सुविधा घेतलेली नसल्यास बॅलट पेपरमार्फत एजीएममध्ये त्यांचे मतदान करणे शक्य होईल. सभासदांनी दूरस्थ ई-मतदान सुविधेमार्फत मतदान केले असल्यास त्यांना एजीएममध्ये त्यांच्या मतदानाच्या हक्काचा वापर करता येणार नाही, तथापि ते एजीएममध्ये हजर राहण्यास हक्कदार आहेत.

६. परिनिरीक्षकांच्या अहवालासह घोषित निष्कर्ष कंपनीची वेबसाईट (www.piramal.com) आणि सीडीएसएलची वेबसाईट (www.evotingindia.com) वर ठेवण्यात येतील आणि स्टॉक एक्स्चेंजेस म्हणजेच नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया (एनएसई) आणि बीएसई लिमिटेड (बीएसई) कडे कळविण्यात येतील.

७. ई-मतदानाशी संबंधित कोणतीही तक्रार श्री. राकेश दळवी, उप व्यवस्थापक, सीडीएसएल, १६ वा मजला, फिरोज जीजीभॉय टॉवर्स, दलाल स्ट्रिट, फोर्ट, मुंबई- ४००००१, ई-मेल: helpdesk.evoting@cdslindia.com, हेल्पडेस्क फोन क्र. १८००२००५५३३ यांना कळवू शकता.

६९ व्या एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट (www.piramal.com) आणि सीडीएसएलची वेबसाईट (www.evotingindia.com), बीएसई वेबसाईट (www.bseindia.com) आणि एनएसई वेबसाईट (www.nseindia.com) वर सुध्दा उपलब्ध आहे.

**पिरामल एंटरप्रायझेस लिमिटेड करिता**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ९ जुलै, २०१६

**लिओनार्ड डी'सुझा**
**कंपनी सचिव**